
सकाळ

# धर्म, विज्ञानासह समकालीन संशोधनावर प्रकाश टाकावा

## डॉ. माणिकराव साळुंखे : इतिहास परिषदेच्या अधिवेशनास प्रारंभ

कोल्हापूर, ता. १० : 'धर्म, विज्ञान व समकालीन संशोधनावर इतिहासकारांनी प्रकाश टाकावा,' असे आवाहन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : अधिवेशनात बोलताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. शेजारी डावीकडून डॉ. अवनीश पाटील, व्ही. डी. माने, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, आर. डी. गायकवाड, प्रा. डॉ. भरतभूषण माळी.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व्ही. डी. माने यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. इतिहास अधिविभाग व जनसंपर्क कार्यालयातर्फे सुरू झालेल्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' उपक्रमातील ३०० व्या भागात साताऱ्याचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक पांडुरंग पाटील यांची माहिती प्रसारित करण्यात आली. तसेच शोधनिबंध संग्रह व स्मरणिकेचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ राजकीय विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर बीजभाषक होते.

डॉ. साळुंखे यांनी धर्मसंस्थांचा अभ्यास, व्यापारीकरण, पर्यावरण ऱ्हास, औद्योगिक क्रांती व त्याचे परिणाम या विषयांवर सखोल मांडणी होणे अपेक्षित असल्याचे सांगितले. तर डॉ. चौसाळकर यांनी 'बदलते जागतिक राजकारण व काही समकालीन संदर्भ,' या विषयावर संवाद साधला. या प्रसंगी डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. नंदा पारेकर, प्राचार्य विजय नलावडे, प्राचार्य विलास पोवार, प्राचार्य आर. डी. गायकवाड उपस्थित होते. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. परिषदेचे अध्यक्ष डॉ. भरतभूषण माळी यांनी परिषदेने राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

लोकमत

# धर्म, विज्ञानावर इतिहासकारांनी प्रकाश टाकावा

## प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे : शिवाजी विद्यापीठ येथे इतिहास परिषदेला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** धर्मसंस्थांचा अभ्यास, व्यापारीकरण, पर्यावरण ऱ्हास, औद्योगिक क्रांती आणि त्याचे परिणाम या विषयांवर सखोल मांडणी होणे अपेक्षित असून, धर्म, विज्ञान आणि समकालीन संशोधन यावर इतिहासकारांनी प्रकाश टाकावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.माणिकराव साळुंखे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी दोनदिवसीय अधिवेशनाला शनिवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये प्रारंभ झाला. डॉ.साळुंखे यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी परिषदेचे बीजभाषक ज्येष्ठ राजकीय विचारवंत प्रा.डॉ.अशोक चौसाळकर यांनी 'बदलते जागतिक राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयाचा संदर्भ देत, जगाच्या बदलत्या राजकारणाचा आढावा घेऊन, त्याच्या जागतिक पातळीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेतला. जागतिक पातळीवरचे गट, त्यांचे वर्चस्ववादी धोरण, त्यातून निर्माण झालेले संघर्ष इ. गोष्टींवर त्यांनी प्रकाश टाकला.

इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ.अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ.दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ.भरतभूषण माळी, माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले, डॉ.एम.ए. लोहार, डॉ.पद्मजा पाटील, डॉ.नंदा पारेकर, प्राचार्य विजयभाऊ नलावडे, प्राचार्य विलास पोवार, प्राचार्य आर.डी. गायकवाड उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे रौप्यमहोत्सवी दोनदिवसीय अधिवेशन शनिवारी शिवाजी विद्यापीठात सुरू झाले. यावेळी माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ राजकीय विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भरतभूषण माळी यांच्या उपस्थितीत स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### व्ही.डी. माने यांचा गौरव

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गोवा स्वातंत्र्य संग्रामात सहभागी असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक यांना परिषदेमार्फत सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमात साताऱ्याचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक पांडुरंग गोविंद पाटील उर्फ पांडू मास्तर यांची माहिती प्रसारित केली गेली. यावेळी परिषदेच्या शोधनिबंध संग्रह आणि स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**आज समारोप :** आज रविवारी सकाळी ११ वाजता डॉ.सुमित्रा कुलकर्णी यांचे 'मराठेकालीन महाराष्ट्रातील नागरिकीकरण' या विषयावर आयोजित केले आहे. यावेळी विविध प्राध्यापक, संशोधक शोधनिबंध सादर करतील.

11 JUN 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धर्म, विज्ञान, समकालीन संशोधनावर इतिहासकारांनी प्रकाश टाकावा

## डॉ. माणिकराव साळुंखे; इतिहास परिषद रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धर्म, विज्ञान आणि समकालीन संशोधन यावर इतिहासकारांनी प्रकाश टाकावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेच्या रौप्यमहोत्सवी दोन दिवसीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. धर्मसंस्थांचा अभ्यास, व्यापारीकरण, पर्यावरण ऱ्हास, औद्योगिक क्रांती आणि त्याचे परिणाम आदी विषयांवर सखोल मांडणी होणे अपेक्षित आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

बीजभाषणात बोलताना ज्येष्ठ राजकीय विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'बदलते जागतिक राजकारण आणि काही समकालीन संदर्भ' या विषयाची मांडणी केली. जगाच्या बदलत्या राजकारणाचा आढावा घेऊन त्याच्या जागतिक पातळीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेतला. जागतिक पातळीवरचे गट, त्यांचे वर्चस्ववादी धोरण, त्यातून निर्माण झालेले संघर्ष इ. गोष्टींवर त्यांनी प्रकाश टाकला. अफगाणिस्तानमध्ये झालेली इस्लामिक राजकीय सत्तांची प्रस्थापना, अफगाणिस्तान राज्यक्रांतीमुळे इस्लामिक दहशतवादाचा झालेला उदय, इराण क्रांती, जागतिक आर्थिक धोरणे, राजकीय सुधारणा, एकपक्षीय सत्ता, चीनमधील माओवाद, सोव्हिएत युनियनचे विघटन या मुद्द्यांवर मांडणी केली.

इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. भरतभूषण माळी यांनी परिषदेने राबविलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गोवा स्वातंत्र्य संग्रामात सहभागी असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व्ही. डी. माने यांना परिषदेमार्फत सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. इतिहास अधिविभाग व शिवाजी विद्यापीठ जनसंपर्क कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमातील ३०० व्या भागाचे प्रसारण करण्यात आले. परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख यांचे सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. नंदा पारेकर, प्राचार्य विजय नलावडे, प्राचार्य विलास पोवार, प्राचार्य आर. डी. गायकवाड उपस्थित होते. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

महासत्ता

# पं.नेहरूंच्या दूरदृष्टीमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण-डॉ.कुबल

कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी)-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं.नेहरू यांनी राबविलेल्या पंचवार्षिक योजनेमुळे देश अन्न धान्यात स्वयंपूर्ण झाला.त्याला पं.नेहरूंची दूरदृष्टी कारणीभूत असल्याचे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ.संजय कुबल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषया अंतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती'या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या महाराष्ट्राच्या संकल्पनेतील कृषी उद्योगाचे प्रारूप या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरेहोते.

यावेळी उपकुल सचिवडॉ.संजय कुबल,उपकुलसचिव सी.एस.कोतमिरे यासह विद्यार्थी,समन्वयक, सहा.प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी व सेवक उपस्थित होते.

पुढारी

# कथ्थक नृत्य कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्यातर्फे कथ्थक नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यास राज्यभरातून आलेल्या विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. केंद्रीय विद्यापीठ त्रिपुरा- आगरतळा येथील संगीत अधिविभागप्रमुख व जयपूर घराण्याचे प्रसिद्ध कथ्थक नर्तक डॉ. अजयकुमार सवने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यवतमाळ, इचलकरंजी, सांगलीतील विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रास्ताविक अधिविभागातील प्रा. डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. डॉ. निखिल भगत यांनी आभार मानले. पाहुण्यांची ओळख भाग्यश्री कालेकर यांनी करून दिली. यावेळी नृत्यगुरू मोहिनी दिवाण, संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे नातू अशोक पाटील व कुटुंबीय, गायक विश्वास सुतार आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# पंडित नेहरूंच्या दूरदृष्टीमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण : डॉ. संजय कुबल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरू यांनी राबवलेल्या पंचवार्षिक योजनेमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. त्याला पं. नेहरूंची दूरदृष्टी कारणीभूत आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयांतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या 'महाराष्ट्राच्या संकल्पनेतील कृषी उद्योगाचे प्रारूप' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते.

डॉ. कुबल म्हणाले, औद्योगिक क्रांतीपूर्वीचा भारत देश कृषिप्रधान होता. त्यावेळी संपूर्ण जग भारत देशावर अवलंबून होते; मात्र परकीय आक्रमणामुळे भारतीय शेतीवर दूरगामी परिणाम झाला. यासाठी ब्रिटिशांचे धोरण कारणीभूत होते.

स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरण व शेती विकाससुद्धा समान रेषेत विकास झाला नाही; कारण औद्योगिकीकरणाला अवाजवी महत्त्व दिले. कृषी धोरण भरभक्कम उभे पाहिजे होते. प्रथम शेती, द्वितीय कारखानदारी आणि तृतीय सेवा क्षेत्र अशा पद्धतीने विकासाची वाढ केली असती, तर कृषी धोरण वेगळे दिसले असते. प्रास्ताविक डॉ. सुशांत माने यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले यांनी केली. आभार डॉ. बबन पाटोळे यांनी मानले. उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुण्यनगरी

# कथ्थक नृत्य कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये आयोजित कथ्थक नृत्य कार्यशाळा उत्साहात पार पडली. दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये केंद्रीय विद्यापीठ त्रिपुरा-आगरताळा येथील संगीत अधिविभागप्रमुख व जयपूर घराण्याचे प्रसिद्ध कथ्थक नर्तक डॉ. अजयकुमार सवने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांबरोबरच यवतमाळ, इचलकरंजी, सांगली आदी भागातील विद्यार्थीही उपस्थित होते. डॉ. सवने यांनी विद्यार्थ्यांना गणेशपरण, तत्कार, गतनिकास, उठाण, कवित्व इत्यादी कथ्थक नृत्यातील प्रकार शिकवले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक अधिविभागातील प्राध्यापक डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. यावेळी डॉ. निखिल भगत, भाग्यश्री कालेकर, मोहिनी दिवाण, संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे नातू अशोक पाटील व कुटुंबीय, संगीत अभ्यासक विश्वास सुतार आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जात आहे. या माध्यमातून अधिविभागातील स्थापत्य (सिव्हिल) विभागामधून १३ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नियुक्ती झाली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांचे प्रोसाहन लाभले.

निवड प्रक्रियेत स्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने शुभांगी सगट, महेश शेळके, तुषार रामेकर, मृणाल पाटील यांना डिझाईन इंजिनिअर व विजय पुंड, समीर बकारकसाब, श्रेयश पाटील, वैभव कुमठेकर, ओंकार निकम यांची साईट इंजिनिअर पदावर निवड केली. सर्वेश कुंभार याची ज्युनिअर इंजिनिअर पदावर नियुक्ती केली आहे. क्रायसो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने दानिश शेख, आयुष लोणारे यांची ग्रॅज्युएट ट्रेनी इंजिनिअर पदावर निवड केली आहे. तसेच आकाश बायजूस कंपनीने रोहन शिंबरे याची फिजिक्स फॅकल्टी म्हणून नेमणूक केलेली आहे. विद्यार्थ्यांना अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी गणेश पाटील व स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. महेश साळुंखे, प्लेसमेंट प्रतिनिधी प्रा. वैभव कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.